# १६. स्वप्न करू साकार

**किशोर पाठक** (१९५२ ते २०२०) :

प्रसिद्ध कवी. 'पालव', 'निरूपण', 'आभाळाचा अनुस्वार' हे कवितासंग्रह; 'पाण्यातला दिवा' हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध. 'रिंग रिंग रिंगण' या लहान मुलांसाठी लिहिलेल्या काव्यसंग्रहास बालकुमार साहित्य संमेलनाचा ग. ह. पाटील पुरस्कार मिळाला आहे.


या कवितेत कवीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकजुटीचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व या कवितेद्वारे कवीने सांगितले आहे.

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।



फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।



हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार ।।

**शब्दार्थ :**

**ललकारणे** – पुकारणे. **नौबत** – डंका, मोठा नगारा. **विभव** – ऐश्वर्य, भाग्य, संपत्ती.

## कृती

**(१) खालील शब्दसमूहांतील संकल्पना स्पष्ट करा.**


(अ) श्रमशक्तीचे मंत्र–

(आ) हस्त शुभंकर–

(इ) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार–

**(२) आकृतिबंध पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**(३) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।

(आ) खालील पंक्तींमधून सूचित होणारा अर्थ लिहा.

शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।

(इ) या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.

(ई) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.


❖ ❖ ❖

ACBWDH

# ❖ व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन)

इयत्ता नववीमध्ये आपण विश्वकोशाची ओळख करून घेतली. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात हे आपण अनुभवले. शब्द तयार कसे होतात किंवा कसे तयार झाले असावेत, याची उत्सुकता आपल्या सर्वांच्या मनात असते. शब्दाची व्युत्पत्ती पाहणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीने आपल्या मुलीचे नाव 'सई' ठेवले. 'सई' हा शब्द संस्कृतमधील 'सखी' म्हणजे मैत्रीण या शब्दावरून आलेला आहे. हे कळल्यावर त्याला किती आनंद होईल! आपल्या परिचयाच्या शब्दांची व्युत्पत्ती कळल्यावर जो आनंद मिळतो तो विद्यार्थ्यांनाही मिळावा. व्युत्पत्ती कोशाची गरज व महत्त्व कळावे व शब्दांची व्युत्पत्ती अभ्यासण्याची सवय लागावी, या हेतूने स्थूलवाचन विभागात समावेश असलेला हा पाठ महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना भाषेच्या प्रवाहात येणाऱ्या अनेक शब्दांच्या उच्चारांचे व अर्थांचे मूळ व्युत्पत्ती कोशाच्या अभ्यासातून उलगडतात. शब्द हा एकच असतो व तो निरनिराळ्या परिस्थितींमध्ये निरनिराळी रूपे धारण करतो. त्या प्रत्येक रूपाला एक किंवा अनेक अर्थ प्राप्त होतात हे विद्यार्थ्यांना समजणे हा, या पाठाचा उद्देश आहे.

## खालील संवाद वाचा.



**राधा** : आई, हे काय आहे गं कोपऱ्यात?

**आई** : अगं, ती सतार आहे. ती आजोबांना इनाम म्हणून मिळालीय महाराजांकडून! गावाकडे होती, ती आज आणली आहे.

**राधा** : इनाम...? इनाम म्हणजे काय गं आई?

**आई** : (हसून) अगं, इनाम म्हणजे बक्षीस!

**राधा** : अगं, माझ्या वर्गातील तनया आहे ना... तिचे आडनाव आहे 'इनामदार'.

**आई** : हो...मला माहीत आहे ती.

**राधा** : इनाम म्हणजे बक्षीस. मग इनामदार म्हणजे...आईऽऽ कसा झाला असेल गं हा शब्द तयार?

**आई** : थांब. आजोबांच्या खोलीत मराठी व्युत्पत्ती कोश आहे. आपण पाहूया हं त्यात 'इनाम' शब्द कसा तयार झाला असेल? त्याची व्युत्पत्ती आपल्याला त्यात सापडेल.

> **इनाम** न. कायमची देणगी, मोफत वतन, बक्षीस Prize, gift, inam, grant [अर. इन्+आम्=वरिष्ठाकडून देणगी]

**आई** : बघितलंस का राधा? हे इथे 'अर.' लिहिले आहे ना! म्हणजे हा अरबी भाषेतला शब्द आहे. आता आपण -दार हा प्रत्यय शोधू.

> **दार** प्र. स्वामित्वदर्शक फारसी प्रत्यय. A termination showing possession

बघ -दार हा फारसी प्रत्यय आहे. स्वामित्वदर्शक म्हणजे एखादी गोष्ट एखाद्याजवळ आहे असे दर्शवणारा प्रत्यय. इथे 'इनामदार' म्हणजे 'ज्याच्याजवळ इनाम आहे तो' असा अर्थ होतो आणि दार म्हणजे एखादी गोष्ट धारण करणारा असा पण अर्थ घेता येईल. 'जबाबदार' हा शब्द तुला माहीत आहे ना! जो जबाबदारी धारण करतो किंवा घेतो, ज्याच्याकडे जबाबदारी असते तो जबाबदार. तसंच 'इनामदार' म्हणजे ज्याच्याजवळ इनाम आहे किंवा ज्याने इनाम धारण केलेले आहे म्हणजेच ज्याला इनाम मिळालेले आहे असा माणूस.

**राधा** : आई, ही माहिती किती छान आहे! आता मी नेहमी असे शब्द शोधत जाईन.

व्युत्पत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान. एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे म्हणजे व्युत्पत्ती सांगणे. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश.

भाषेत अनेक कारणांनी बदल होत जातात. व्युत्पत्ती कोशात या बदलाचे मूळ आपल्याला शोधता येते.

उदा., भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने जे फरक होतात ते भिन्न भिन्न काळांतील भाषा बोलणाऱ्यांच्या शब्दांच्या उच्चारांचे व समाजामध्ये वापरात असलेल्या शब्दांच्या होणाऱ्या अर्थोचित बदलांचे परिणाम आहेत. व्युत्पत्ती कोश या बदलाचे स्वरूप स्पष्ट करतो.

उदा., मराठीतील 'आग' हा शब्द 'संस्कृत'मधील 'अग्नि' पासून आला, हे आपल्याला व्युत्पत्ती कोशामुळे कळते. भाषेत बदल होण्यामागे बऱ्याचदा सुलभीकरणाची म्हणजे सोपे करण्याची प्रवृत्ती असते.

उदा., 'अग्नि' पासून 'आग' हा शब्द तयार होण्यापूर्वी प्राकृतमध्ये 'अग्गि' हा शब्द तयार झाला. हा उच्चार सोपा होत होत मराठी, हिंदी यांसारख्या आधुनिक भाषांत त्यापासून 'आग' हा शब्द तयार झाला. कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते (कधी कधी व्याकरणिक घटकांचीही देवघेव होते.) या सर्वांची नोंद व्युत्पत्ती कोशामध्ये पाहायला सापडते. शब्दसिद्धीमध्ये आपण हे पाहतोच.

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | तोंड |
| कन्नड | तुप्प | तूप |
| अरबी | इत्र | अत्तर |

काळाप्रमाणे शब्दांच्या स्वरूपात, त्यांच्या अर्थात, त्यांच्या परस्परसंबंधात बदल होतात आणि हे बदल अपरिहार्य असतात. निरीक्षण करा, तुमचे आजी-आजोबा बोलत असलेली भाषा, तुमचे आई-बाबा बोलत असलेली भाषा, तुम्ही आणि तुमच्या भावंडांची भाषा, तुम्ही आणि तुमच्या मित्रांमधील भाषा. (उदा., व्हॉटस्ॲपची भाषा) या सगळ्यांत खूप फरक आहे हे तुमच्या लक्षात आलंच असेल. कधी कधी पूर्वी अस्तित्वात असलेल्या एखाद्या शब्दाचा अर्थ हळूहळू बदलत जातो किंवा मूळ अर्थाबरोबरच आणखी एखादा अर्थ भाषेमध्ये स्थिरावत जातो. उदा., 'शहाणा' या शब्दाचा अर्थ पूर्वी हुशार, बुद्धिमान, चलाख असा होता. हा शब्द सज्ञान या शब्दावरून आला असावा असे व्युत्पत्ती कोशावरून दिसते. आता मूळ अर्थाव्यतिरिक्त 'शहाणा'चा 'अतिशहाणा' असा अर्थसुद्धा रूढ होत आहे. काही काळाने याची नोंद व्युत्पत्ती कोशात दिसण्याची शक्यता आहे.

एकाच अर्थाचे शब्द निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळी रूपे धारण करतात. उदा.,

| शब्द अनेक | अर्थ एक | वेगवेगळ्या संदर्भांत वापर |
|---|---|---|
| वात, पवन, मरुत, समीर, अनिल | वारा | पवनचक्की ✓<br>वातचक्की ✕ अनिलचक्की ✕ |
| | | वातचक्र ✓ समीरचक्र ✕ |

तसेच समान दिसणाऱ्या शब्दाचे अर्थ वेगवेगळे असतात.

| शब्द एक | वेगवेगळे अर्थ |
|---|---|
| (१) पाठ | (१) माझी 'पाठ' दुखते आहे. पाठ – शरीराचा अवयव<br>(२) हा 'पाठ' सोपा आहे. पाठ–पुस्तकातील धडा |

आपल्याला एखाद्या शब्दाबद्दल कुतूहल निर्माण झाले, तर आपण व्युत्पत्ती कोश पाहातो. उदा., 'दिवाळी' हा शब्द कुठून आला असेल ?



**दिवाळी** स्त्री. दिव्यांची रांग, एक सण (दिव्यांसंबंधी)
A row of lights (hence) a Hindu Festival with nocturnal illuminations.
[सं. दीपावलि, दीपालि; प्रा. दिवाली, दीवावली, बं. दिउयाली; ओ. दिआली; हिं/पं. दिवाली, सिं. डिआरी, गु. दिवाळी]

'दिवाळी' हा शब्द आपण पाहिला. मूळ संस्कृत शब्द 'दीपावलि'पासून तो आला आहे. (संस्कृत शब्द 'दीपावलि'चा 'लि' ऱ्हस्व असला तरी मराठीत तो दीर्घ लिहितात. या शब्दांतील 'दी' व 'ली' दोन्ही दीर्घ आहेत; पण 'दिवाळी' हा शब्द मराठी आहे. त्यात 'दि' हा ऱ्हस्व येतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.) विश्वकोशातील या शब्दाची नोंद पाहिल्यावर कंसातील मजकूर पाहताना हे नक्की काय आहे असे तुम्हांला वाटले असेल; पण ही शब्दांची लघुरूपे आहेत हे कळल्यावर आणि त्यांची मूळ रूपे समजल्यावर तुम्हांला ते सोपे वाटेल आणि आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांच्या अंगणातही बागडतो आहे हे कळल्यावर मजाही वाटेल.

व्युत्पत्ती कोशात अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे, हेही दाखवलेले असते. वरच्या उदाहरणात शब्दांची लघुरूपे आलेली आहेत ती जाणून घेणे आवश्यक आहे. शब्दात सुरुवातीला शब्दाची जात लिहिलेली असते. नामाच्या बाबतीत मात्र पुं.-पुल्लिंगी, स्त्री.- स्त्रीलिंगी, न/नपुं.-नपुंसकलिंगी असे लिहिलेले असते. 'दिवाळी' हा स्त्रीलिंगी शब्द असल्याने 'स्त्री.' हे लघुरूप पाहायला मिळते. त्यानंतर वेगवेगळ्या भाषांसाठी लघुरूपे वापरलेली दिसतात. सं-संस्कृत, प्रा-प्राकृत, बं-बंगाली, ओ-ओडिया, हिं-हिंदी, पं-पंजाबी, सिं-सिंधी, गु-गुजराती. या व्यतिरिक्त कोशकार कधी एखाद्या शब्दामागचा इतिहास सांगतात. कधी कधी एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली वेगळी व्युत्पत्ती सांगून ती त्यांना योग्य वाटते की नाही हेही सांगतात.

**व्युत्पत्ती कोशाचे कार्य**

- (१) शब्दाचे मूळ रूप दाखवणे.
- (२) अर्थांतील बदल स्पष्ट करणे.
- (३) उच्चारातील बदल व फरक दाखवणे.
- (४) बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(यांपैकी पहिल्या दोन बाबींचा अगदी थोडक्यात, सोदाहरण परिचय पाठात आला आहे.

**लक्षात ठेवा.**

(१) १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.
(२) स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते.
(३) 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे', असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला.
(४) कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर या कार्याची जबाबदारी सोपवण्यात आली.
(५) बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली.
(६) १९४६ साली या मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले. यानंतरही व्युत्पत्ती कोशाच्या आवृत्त्या निघालेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्या जरूर पाहाव्यात.

- **ताकास तूर लागू न देणे हा वाक्प्रचार कसा आला असावा हे आपण समजून घेऊया.**

शाळेत नाटक बसवले जाणार होते. नाटकात काम करणाऱ्यांमध्ये शरदची निवड झाली होती. मित्र त्याच्याकडून ही बातमी काढून घेण्यासाठी खूप प्रयत्न करत होते; पण शरदने ताकास तूर लागू दिली नाही. अशा प्रकारचे प्रसंग आपल्यावरही अनेकदा येत असतात. आपणही आपल्या मनात काय आहे हे लोकांना अजिबात कळू देत नाही. लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना आपण अशी काही उत्तरे देत राहतो, की त्यांना काही कळूच नये. लोकही मग म्हणतात, ''अरे, हा अगदी ताकास तूर लागू देत नाही की!''

आता 'ताकास तूर लागू न देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ आपल्याला कळला आहेच. कोशातही त्याचा अर्थ ''(एखाद्या गोष्टीचा दुसऱ्यास) बिलकूल थांग लागू न देणे; टाळाटाळी करून स्वत:च्या मनातील विचार दुसऱ्यास न समजू देणे'' अशाच प्रकारचा आहे. पण ताकास तूर लागणे म्हणजे काय? ताक म्हणजे काय? आपण पितो ते ताक? आणि तूर म्हणजे तरी काय? आपल्या मराठी लोकांच्या जेवणात ज्या तुरीच्या डाळीचं वरण असतं ते तूर नावाचं धान्य की काय? ताकाचा अन् तुरीचा संबंध येतो तरी कुठे? येथील शब्द 'ताक' असा नसून 'ताका' असा आहे आणि 'ताका' म्हणजे 'तागा'. 'तागा'चा अर्थ 'मराठी व्युत्पत्ती कोशा'मध्ये कृ. पां. कुलकर्णी यांनी (१) नव्या (अखंड) कापडाचा गठ्ठा; किंवा (२) (विणकराच्या) मागावरली सबंध न फाडलेले (कापडाचे) ठाण असा दिलेला आहे. 'महाराष्ट्र शब्दकोशा'च्या चौथ्या विभागात देखील असा अर्थ दिलेला आहे.

ताका-गा : मागावरील संबंध न फाडलेले कापड; (कापड इत्यादिकांचे) ठाण. (२) दोरा, धागा.

आता 'तूर' या शब्दाचा 'महाराष्ट्र शब्दकोशा'तला अर्थ पाहू. 'तूर' म्हणजे एक प्रकारचं द्विदल धान्य हा अर्थ तर आहेच. पण या शब्दाला दुसराही एक अर्थ आहे. तो असा-

तूर : विणलेले वस्त्र ज्या लाकडाभोवती गुंडाळले जाते ते लाकूड; कोष्ट्याची दांडी

कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या 'मराठी व्युत्पत्ती कोशा'त तूरचा असाच अर्थ दिलेला आहे.

तर 'ताका' (किंवा 'तागा') आणि 'तूर' या शब्दांचे आपल्याला नेहमी माहीत असलेले अर्थ न घेता इथे हे विणकराच्या व्यवसायातले अर्थच ध्यानात घ्यायला हवेत. कारण विणकराच्या मागावरचा ताका किंवा तागा हा वास्तविक 'तुरे'वर म्हणजेच लाकडाभोवती गुंडाळला जायला हवा. पण 'ताका'चा 'तूर' नामक वस्तूशी संबंधच येऊ द्यायचा नाही. ताका व तूर यांचा संबंध टाळायचा. म्हणजे कापड आणि ज्या लाकडाभोवती ते गुंडाळायचे ते लाकूड यांचा संबंध टाळायचा; म्हणजे जे काम खरोखर अपेक्षित असते, व्हायला हवे असते, होणे रास्त असते, तेच मुद्दाम होऊ द्यायचे नाही, असा याचा अर्थ आहे.

**('गंमत शब्दांची' डॉ. द. दि. पुंडे या पुस्तकातून)**

## कृती

**(१) टीप लिहा.**

व्युत्पत्ती कोशाचे कार्य

**(२) खालील मुद्द्यांच्या आधारे एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**

व्युत्पत्ती कोश
- निर्मितीचा ठराव
- निर्मितीची जबाबदारी
- निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- त्याचे प्रकाशन

**(३) पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा.**

व्युत्पत्ती कोश

शब्द अनेक, अर्थ एक

उदा., जल, नीर, तोय, ...
– पाणी

शब्द एक, अर्थ अनेक

उदा., पान–
झाडाचे पान (पर्ण),
पुस्तकाचे पान (पृष्ठ)

**उपक्रम :** शिक्षकांच्या मदतीने व्युत्पत्ती कोशातून खालील शब्दांची व्युत्पत्ती शोधून लिहा.

(अ) प्रावीण्य

(आ) चिल्लर

(इ) वीज

(ई) गुपचूप

❖ ❖ ❖

## रसग्रहण

शिशुवर्गात तालासुरांत बडबडगीते म्हणणारा विद्यार्थी जेव्हा मोठा होऊ लागतो तेव्हा लहानपणी गायलेल्या कवितांचा अर्थ त्याला कळू लागतो किंबहुना मोठ्या वर्गात वृत्त, अलंकार शिकल्यानंतर कवितेचं तंत्र कळू लागतं. कविता वाचताना त्याचं मन एका अनामिक आनंदानं भरून जातं. कधी डोळ्यांत पाणी येतं, कधी मन अंतर्मुख होतं, कधी कवितेतील व्यक्तिचित्र, घटना, नैसर्गिक सौंदर्य डोळ्यांसमोर जसंच्या तसं उभं राहतं, तर कधी समाजातील वास्तवाच्या दाहक चित्रणाची जाणीव त्याला होते. या सर्व भावभावनांचा मनात चाललेला व्यापार म्हणजेच कवितेच्या आस्वादाकडे मन वळतं आहे याचं चिन्ह होय.

कृतिपत्रिकेतील पद्यविभागाच्या मूल्यमापनामध्ये कवितेचे रसग्रहण हा घटक समाविष्ट केलेला आहे. कवितेचा आस्वाद घेता येणे, कवितेचे रसग्रहण करता येणे, यादृष्टीने कवितांचा अभ्यास करायचा आहे. कृतिपत्रिकेतील पद्यांशाचे रसग्रहण करा, या घटकासाठी रसग्रहण व काव्यसौंदर्य याचे विवेचन समजून घ्या.

कवितेचे रसग्रहण आशयसौंदर्य, काव्यसौंदर्य आणि भाषिक सौंदर्य (भाषिक वैशिष्ट्ये) या तीन प्रमुख मुद्द्यांना धरून केले जाते. या तीन मुद्द्यांमध्ये अगदी स्पष्ट विभाजन रेषा नसते. ते एकमेकांमध्ये मिसळून गेलेले असतात, म्हणूनच कवितेमध्ये त्यांचा एकत्रितपणे अनुभव येतो. कवितेत अल्प शब्दांतून मोठा आशय व्यक्त झालेला असतो. कवितेत अचूक आणि चपखल शब्दनिवड असते. कल्पनांच्या माध्यमातून, कधी प्रतिमांमधून तर कधी भाषिक वैशिष्ट्यांमधून कवितेचा आशय उलगडायला मदत होत असते, तसेच कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारणही तुम्हांला सांगता यायला हवे. याशिवाय कवितेचे स्वत:चे अंगभूत गुण तुम्हांला माहीत असायला हवेत.

(१) काव्यातील शब्द रमणीय अर्थ व्यक्त करतात.

(२) शब्द उत्कट भावनेचा सहज उद्रेक करतात.

(३) शब्दांना आंतरिक लय असते तर कधी रचनाच तालबद्ध असते.

वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन कवितेचा अभ्यास केल्यास कवितेचा आशय आणि भाषासौंदर्याचा एकत्रित अनुभव घेता येतो. लक्षात ठेवा, की संपूर्ण कवितेऐवजी कवितेतील काही ओळींचे रसग्रहण करायचे असेल, तर तेही त्या मुद्द्यांना धरून करता यायला हवे. प्रत्येक ओळीच्या बाबतीत सगळेच मुद्दे लागू पडतील असे नाही; परंतु त्या ओळींतील आशयाचे काव्यसौंदर्य उलगडता यायला हवे हे महत्त्वाचे असते.

| रसग्रहण | | |
|---|---|---|
| **आशयसौंदर्य** | **काव्यसौंदर्य** | **भाषिक वैशिष्ट्ये** |
| कवितेचा विषय, मध्यवर्ती कल्पना, संदेश, उपदेश, मूल्य, कवितेतून मिळणारा एकत्रित अनुभव | अर्थालंकार, रस, विविध कल्पना, प्रतिमा, विविध भावना. | कवींची भाषाशैली (ग्रामीण, बोलीभाषा, संवादात्मक भाषा, निवेदनात्मक, चित्रदर्शी) शब्दालंकार, आंतरिक लय, नादमाधुर्य, वृत्त (असल्यास) |

## काव्यसौंदर्य

काव्यसौंदर्याची अभिव्यक्ती म्हणजे कवितेच्या वाचनाने अथवा श्रवणाने मनावर झालेल्या संस्कारांना शब्दात्मक रूप देणे होय. कवितेची मूळ संकल्पना, भावना, विचार यांच्या सजावटीसाठी कवीने केलेली विशिष्ट मांडणी, योजलेले शब्दालंकार, अवलंबलेले वृत्त त्याचप्रमाणे कवीने निर्मिलेल्या सृष्टीचे आपल्या मनावर झालेले संस्कार आणि त्यावरून आठवणारी इतर क्षेत्रांतील साम्यस्थळे यांचा एकत्रित परिणाम काव्यसौंदर्यात असतो. कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण समर्पक शब्दांत सकारण कथन करणे म्हणजे काव्यसौंदर्य जाणणे होय.

काव्यसौंदर्यामध्ये विचारसौंदर्य, आशयसौंदर्य आणि भावसौंदर्य अशा वेगवेगळ्या संकल्पनांचा समावेश आहे. कवितेत विचार, आशय आणि भाव या तीन वेगवेगळ्या संकल्पना असल्या तरी त्यांच्यातील विभाजनरेषा तितकीशी स्पष्ट नसते, कारण त्या परस्परांशी एकसंध असतात.

प्रत्येक कवितेच्या काव्यसौंदर्याचा विचार करताना त्यात मांडलेला मध्यवर्ती विचार समजून घेणे महत्त्वाचे असते. उदा., 'औक्षण' या कवितेत राष्ट्राच्या रक्षणार्थ सदैव तत्पर असलेल्या सैनिकाबद्दल सर्वच समाजाने व्यक्त केलेली कृतज्ञता जाणवते. तसेच 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेतून कोणत्याही परिस्थितीत झाडासारखं आतून उमलून यावं, आनंदानं जगता यावं, असा संदेश आपणाला मिळतो.

आता तुमच्या लक्षात येईल, की कवितेचा विषय, आशय, कवितेत मांडलेला विचार, ठसवलेलं मूल्य, दिलेला संदेश आणि कवितेतील भावभावना या सगळ्यांमधून काव्यसौंदर्य प्रकट होत असते, त्यामुळे काव्यसौंदर्याचा अभ्यास करताना प्रत्येक मुद्द्याचा विचार करावा. कवितेत व्यक्त होणारा भाव रसनिर्मितीचा स्रोत असतो. तो समजून कृतिपत्रिकेतील काव्यसौंदर्यांतर्गत येणाऱ्या विचारसौंदर्य, भावसौंदर्य व अर्थसौंदर्य यांवर आधारित कृतींचा अभ्यास खालील मुद्द्यांना धरून करावा.

| काव्यसौंदर्य | | |
|---|---|---|
| **अर्थसौंदर्य** | **विचारसौंदर्य** | **भावसौंदर्य** |
| कवितेचा विषय, कवितेची मध्यवर्ती कल्पना, आशयाला पुढे नेणारा विषय इत्यादी. | कवितेतून व्यक्त होणारा विचार, कधी सर्वसमावेशक, कधी नेहमीपेक्षा वेगळा. अनुभवांचा अंतर्मुख होऊन केलेला विचार इत्यादी. | स्वत:च्या स्वतंत्र भावनांचा आविष्कार, संवेदनशीलता, भावना जागृतीसाठी अंतर्मुख विचार इत्यादी. |

# ♦ उपयोजित लेखन

## १. पत्रलेखन

पत्रलेखन ही कला आहे. आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना/विचारांचे चांगल्या भाषेत संक्रमण करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

तुम्ही मागील वर्षीही 'पत्रलेखन' या घटकाचा अभ्यास केलेला आहे. ते पत्रलेखन तुम्ही पारंपरिक पद्धतीने करत होतात. आता तुम्ही तंत्रज्ञानयुगात वावरत आहात. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांद्वारे तुमची तंत्रज्ञानाशी गट्टीही झाली आहे.

'फोन'चा वापर वाढल्यानंतर पत्रलेखनाची गरज काहीशी कमी झालेली आहे. असे असले तरी अनौपचारिक पत्रात आपल्या भावना शब्दांत प्रभावीपणे व्यक्त करता येणे, हे आवश्यक कौशल्य आहे. तसेच औपचारिक पत्रासाठी आपले म्हणणे, विचार, मागणी, तक्रार, विनंती इत्यादी गोष्टी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, हे आवश्यक कौशल्य आहे. आजही पत्रलेखन ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे. यापुढे तंत्रज्ञानाच्या लेखनपद्धतीने आपले लेखन कौशल्य प्रकट व्हायला हवे.

पत्रलेखनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. यापुढील काळात तुम्हांला मेल पाठवण्याचे तंत्र अवगत करावे लागणार आहे. म्हणूनच या वर्षी आपण पत्राचे प्रारूप हे नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार लक्षात घेणार आहोत.

**यावर्षी आपण खालील पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत.**

**पत्रलेखन**

- **अनौपचारिक**
  - **कौटुंबिक**
  - जवळच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र
- **औपचारिक**
  - **मागणी, विनंती**
  - कार्यालयीन व व्यावसायिक पत्र

| औपचारिक | अनौपचारिक |
|---|---|
| (१) प्रति, लिहिल्यानंतर व्यक्तीचा हुद्दा योग्य तो लिहिणे.<br>(२) पत्राचा विषय लिहिणे.<br>(३) अचूक शब्दांत नेमका आशय मांडणे.<br>(४) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे. | (१) व्यक्तीचा उल्लेख योग्य/नात्याप्रमाणे/ सन्मानपूर्वक करणे.<br>(२) व्यक्तीचे क्षेमकुशल विचारणे.<br>(३) भावना प्रभावी शब्दांत मांडणे.<br>(४) नात्यातील जिव्हाळ्यानुसार विस्तृत लेखन करणे.<br>(५) पत्राचा विषय लिहिण्याची गरज नाही.<br>(६) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक. |

[टीप – पत्राला उत्तर मिळण्यासाठी पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक ठरते. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आवश्यकता नाही. (ई-मेलसाठी पाकीट नसते.)]

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक ———

प्रति, ———

माननीय ———— ,

————

विषय : ———

महोदय,

————————

मुख्य मजकूर

आपला/आपली

————

पत्ता

————

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

### पत्रलेखन नमुना कृती–१

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

*'झाडे लावा... झाडे जगवा'*

दिनांक ५ जून

**हिरवाई ट्रस्ट, तळेगांव दाभाडे**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

रोपांचे मोफत वाटप

संपर्क– हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगांव दाभाडे
hirwaitrust@gmail.com

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

- शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.
- चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

### पत्रलेखन नमुना कृती–२

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

अ आ इ ई

***मराठी सुलेखन वर्ग***

विनय ॲकॅडमी तर्फे

कालावधी १ मे ते ३१ मे

सुलेखन वर्गाचे आयोजन

संपर्क :
श्री. विनय गायकवाड
२, सोमवार पेठ, कराड
marathisulekhan@gmail.com
भ्रमणध्वनी– ८८४४००१७००

माफक फी

विद्यार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.

# २. सारांश लेखन

'आपले म्हणणे थोडक्यात सांगा', हे आजच्या धावपळीच्या युगातले परवलीचे वाक्य आहे. एखाद्या विस्तृत लेखनाला त्याचा संपूर्ण आशय लक्षात येईल अशा पद्धतीने संक्षिप्त रूप देणे हे महत्वाचे कौशल्य आहे. हे कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने 'सारांश लेखन' या घटकाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**सारांश लेखनाच्या पायऱ्या :**

(१) दिलेल्या परिच्छेदाचे वाचन.

(२) परिच्छेदातील आशयाचे आकलन होणे.

(३) मध्यवर्ती विचार जाणून घेणे.

(४) समजलेला विचार स्वत:च्या शब्दांत थोडक्यात मांडणे.

(**टीप–** कमीत कमी शब्दांत सारांश लिहिणे व त्यातून परिच्छेदातील आशयाचा पूर्ण अर्थ प्रतिबिंबित होणे महत्वाचे आहे.)

**कृतिपत्रिकेसाठी–**

(१) सारांश लेखन उतारा १०० ते १२० शब्दांचा असेल. (२) दिलेल्या परिच्छेदाचा थोडक्या (कमीत कमी) शब्दांत सारांश लिहिणे अपेक्षित आहे. (३) परिच्छेदाच्या सारांशातून संपूर्ण आशय लक्षात येणे अपेक्षित आहे. (४) सारांश लेखनाची मध्यवर्ती कल्पना स्वत:च्या शब्दांत मांडणे अपेक्षित आहे. (५) परिच्छेदाचे वा सारांशाचे शब्द मोजून नोंद करणे आवश्यक नाही.

### सारांश लेखन नमुना कृती

*** खालील उताऱ्याचे सारांश लेखन करा.**

मुकुल डे यांच्यासारखा आज जागतिक कीर्ती मिळवलेला चित्रकार शाळेतल्या गणित, व्याकरण वगैरे विषयांत अजिबात रमत नसे. गुरुदेवांनी त्याच्या हाती रंग, कागद आणि ब्रश दिले आणि सांगितले, ''यात तुला आवड आहे ना, मग चित्रे काढ.'' शांतिदेव घोषांना सुरांचे आणि नृत्याचे प्रेम. त्यांना तंबोरा आणि घुंगरू दिले. निसर्गात वृक्षवल्ली जशा स्वधर्माने वाढतात तसे मानवी जीवन वाढले पाहिजे.नारळाच्या झाडाकडून आंब्याची अपेक्षा केली नाही. भेंडीच्या रोपाला केळी का लटकत नाहीत याची चिंता केली नाही. एकदा रोप कसले आहे हे ओळखल्यावर मग त्याला योग्य ते खतपाणी देऊन ते कसे फुलेल आणि फळ धरील ते मात्र पाहिले. त्याप्रमाणे जोपासले. सगळ्या झाडांना पाणी, ऊन आणि माती हवीच. त्याप्रमाणे किमान आवश्यक शिक्षण देऊन ज्याची जिथे गती त्या क्षेत्रात त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ कशी होईल ते पाहिले. म्हणूनच शांतिनिकेतनात मुलामुलींची भरती प्राथमिक शाळेपासून करण्याचा गुरुदेवांचा आग्रह असे.

***निसर्गातील वृक्षवेली स्वधर्माने वाढतात त्याप्रमाणे विद्यार्थ्याने वाढावे अशी गुरुदेवांची इच्छा असल्यामुळे त्यांनी प्रसिद्ध चित्रकार मुकुल डे यांना चित्रकलेकडे व नृत्य प्रेमी शांतिघोषांना संगीत कलेकडे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. व्यक्तीची आवड व योग्यता ओळखून त्याला योग्य शिक्षण दिले की त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ होते.***

# ३. जाहिरात लेखन

आजच्या स्पर्धेच्या युगाचा 'जाहिरात' हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या यशस्वितेवर उत्पादनाच्या विक्रीचा आलेख ठरतो, म्हणून एखाद्या उत्पादनाची जाहिरात करणे ही अत्यंत सृजनशील कला आहे आणि ती आत्मसात करणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे तंत्र आहे.

आजच्या संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांच्यातील क्रांतीमुळे जाहिरात क्षेत्राची कक्षा अधिक विस्तारते आहे.

लोकांच्या मनात उत्पादनाबाबत आवड निर्माण करणे, त्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हा जाहिरातीचा प्रमुख उद्देश असतो.

- **जाहिरात लेखन करताना खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.**

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

(१) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय हे उत्तम जाहिरातीचे सूत्र आहे.
(२) जाहिरातीकडे लक्ष वेधले जाईल अशी लक्षवेधी शब्दरचना असावी.
(३) कशाची जाहिरात आहे हे ठळकपणे व आकर्षकपणे नमूद करावे.
(४) आलंकारिक, काव्यमय, प्रभावी शब्दांचा वापर करून जाहिरात अधिक आकर्षक करावी.
(५) जाहिराती तयार करताना समर्पक व लक्षवेधी भाषेला महत्त्व असावे.
(६) ग्राहकांची बदलती आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसावे.
(७) जाहिरातीमधील उत्पादनाची गुणवत्ता महत्त्वाची असते, त्यामुळे सवलतीचा उल्लेख असणे आवश्यक नाही.
(८) जाहिरातीमध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

**✻ कृतिपत्रिकेमध्ये –** (१) जाहिरात पेनने लिहावी, पेन्सिलचा वापर करू नये.
(२) चित्र काढण्याची आवश्यकता नाही.

**जाहिरात लेखनाच्या मूल्यमापन कृती**

- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन करणे.

या व्यतिरिक्त वेगळ्या पद्धतीने, सृजनशीलतेने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील, वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

## जाहिरात लेखन नमुना कृती

(अ) खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.

'आरोग्यम् धनसम्पदा'

**वाळके शक्ती व्यायामशाळा**

प्रो. विशाल वाळके यांची व्यायामशाळा
योगासने व व्यायाम हीच आरोग्याची गुरुकिल्ली

वेळ
सकाळी ५ ते १०
सायं ५ ते ९

**आमची वैशिष्ट्ये**

* वातानुकूलित प्रशस्त जागा * सोईस्कर वेळा
* आधुनिक सामग्री * तज्ज्ञ प्रशिक्षक

संपर्क पत्ता – वाळके शक्ती व्यायामशाळा, 'प्राजक्त' हिल टॉप रोड, अमरावती १४

कृती सोडवा–

(१) व्यायामशाळेचे व्यवस्थापक –

(२) व्यायामशाळेच्या ब्रीदवाक्याचा अर्थ –

(३) व्यायामशाळेची वैशिष्ट्ये –

(४) जाहिरातीतून मिळणारा संदेश–

(आ) दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन

**आईस्क्रीम पार्लर**

- **वरील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**

(इ) शब्दांवरून जाहिरात लेखन :

**प्रवासी बॅग्ज, मजबूत, सुंदर रंग**
**ग्राहक समाधान**

- **वरील शब्दांचा वापर करून जाहिरात तयार करा.**

# ४. बातमी लेखन

आजचे युग हे माहितीचे युग आहे. तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यांच्यामुळे जग खरेच जवळ आले आहे. जगात कुठेही घडलेल्या घटना, त्याची अचूक माहिती आपल्याला घरात बसून वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांद्‌वारे सविस्तर कळते. रोजच्या जीवनातील अगदी **'जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे उद्या शहराचा पाणीपुरवठा बंद राहील'** यांसारख्या आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बातम्यांपासून **'भारताकडून क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी'** अशा राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या बातम्यांपर्यंत सर्व बातम्या आपल्याला कळतात. माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे, हे बातमीचे प्रमुख उद्‌देश असतात.

थोडक्यात 'बातमी' हा आजच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच वस्तुस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे (बातमी लेखन करणे) हे आज महत्त्वाचे कौशल्य ठरते. बातमी घडून गेलेल्या घटनांची त्याचप्रमाणे घडणाऱ्या नियोजित कार्याचीही होते. ज्यात काय घडले? कधी घडले? कोठे घडले? कसे घडले? कोण-कोण उपस्थित होते? या प्रश्नांची उत्तरे मिळतात, ती म्हणजे बातमी. म्हणजेच बातमी लेखनात जसे घडले तसे यथातथ्य वर्णन करायला हवे.

बातमी लेखनासाठी आवश्यक गुण- (१) लेखन कौशल्य (२) भाषेचे उत्तम ज्ञान (३) व्याकरणाची जाण (४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना (५) समग्र वाचन.

कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्त्वाचे असते.

(१) घटनेची विश्वासार्हता.
(२) तटस्थ भूमिकेतून लेखन.
(३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.
(४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्त्वाचे.
(५) स्वत:च्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये.

- **बातमी तयार करण्याचे निकष :**

(१) शीर्षक - बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा/घटनेचा आरसा असतो.
(२) दिनांक, स्थळ, कालावधी संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
(३) घटना घडण्याच्या स्थितीप्रमाणे बातमीलेखनात काळाचा वापर केला जातो.
(४) जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत असे संकेत आहेत.
(५) बातमी लिहिताना प्रथम महत्त्वाचा मुद्‌दा नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमीचे क्षेत्र**

सांस्कृतिक, क्रीडा, राजकीय, शालेय/शैक्षणिक, सामाजिक, वाङ्‌मयीन, वैद्यकीय, वैज्ञानिक, दैनंदिन घटना या घटकांच्या संदर्भात घडलेल्या घटनांच्या बातम्या तयार होतात.

- **बातमी तयार करणे – मूल्यमापन कृती :**

(१) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.
(२) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.
(३) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

## बातमीलेखन

### नमुना कृती

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**
  **शहराच्या प्रदूषण पातळीत वाढ.**

आमच्या वार्ताहराकडून | **जनविकास** | दिनांक : २० नोव्हेंबर

### *शहराच्या प्रदूषण पातळीत वाढ*

काल (१९ नोव्हेंबर) दिवाळीतील लक्ष्मीपूजनानंतर शहराच्या प्रदूषण पातळीत ५० टक्क्यांनी वाढ झाल्याची नोंद झाली. आमच्या प्रतिनिधींनी काही जबाबदार नागरिकांची भेट घेतली. नागरिकांनी आपल्या प्रतिक्रियांमध्ये नाराजी व चिंता व्यक्त केली. प्रदूषणामुळे नागरिकांच्या स्वास्थ्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, सण साजरे करण्याबाबत जनतेचे प्रबोधन व्हायलाच हवे, महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याने याची गंभीर दखल घ्यायला हवी, कायद्यातील तरतुदीसंबंधीही विचार व्हायला हवा, अशा प्रतिक्रिया सर्वांनीच आमच्या प्रतिनिधींकडे नोंदवल्या.

- **खालील शीर्षकावरून बातमी तयार करा.**

शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम,
वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न.

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**

रेल्वे प्रवासात प्रवासी नागरिकांजवळ स्वओळखपत्र असणे अनिवार्य. (आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन कार्ड यांपैकी कोणतेही एक.)

# ५. कथालेखन

कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, नवनिर्मिती व सृजनशीलतेला वाव देणारा हा विषय आहे.

'कथ्यते इति कथा!' म्हणजेच सांगितली जाते ती कथा. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथा ही आपल्या कल्पनेने, विचाराने, सृजनशीलतेने रचली जाते. ती पूर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असूनही कथेच्या रूपात मांडली जाऊ शकते. कथेतून आनंद मिळतो त्याप्रमाणे कथा विचारप्रवर्तकही असतात. कथेतून आनंदाबरोबरच विचारांनाही दिशा मिळते. कथाबीजाच्या विषयाला पात्र, घटना, तर्कसंगत विचार यांनी फुलवणे हे लेखन कौशल्य आहे. लेखनकौशल्य विकसित करणे हा कथालेखन घटकाच्या अभ्यासाचा हेतू आहे.

- **उत्तम कथालेखनासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरते.**

(१) कथेला योग्य शीर्षक द्यावे. (तात्पर्य लिहिण्याची आवश्यकता नाही.)

(२) शीर्षकावरून कथेच्या विषयाची (कथाबीजाची) कल्पना यायला हवी.

(३) शीर्षक म्हणून सुविचार, म्हण असावी असे बंधन नाही.

(४) कथा भूतकाळात लिहावी.

(५) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.

(६) कथेला भाषेचा, घटनांचा ओघ, कालानुक्रम असणे आवश्यक आहे.

(७) कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांचे संवाद, पात्रानुसार योग्य भाषा असावी.

(८) कथेत प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करावी.

- **कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

(१) कथाबीजावरून कथालेखन.

(२) शीर्षकावरून कथालेखन.

(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

(४) अपूर्ण कथा पूर्ण करणे.

(अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे.

(ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) मुद्द्यांवरून कथालेखन.

[**टीप–** कथालेखनासाठी वर दिलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.]

## कथालेखन

### नमुना कृती

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

दिवस कधी मावळला ते कळलेच नाही त्या दिवशी! पाहुण्यांनी घर भरून गेलं होतं. आजीच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत होती. सर्वजण या निमित्ताने एकत्र आलेले पाहून आजी तृप्त झाली होती. एकमेकांशी रक्ताने व मनाने जोडलेल्या तीन पिढ्या एकत्र जमल्या होत्या. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर संध्याकाळी हास्यविनोदात, मनमोकळ्या गप्पांत सारेजण दंग होते आणि अगदी अचानक या गप्पांत एक अनोळखी आवाज ऐकू आला. 'जिजी...मी आलो ग!' खूप वर्षांनी आजीने हा आवाज ऐकला आणि .................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

- **खालील शब्दांना एकत्र गुंफून सुंदर कथा तयार करा.**

मैत्री → दप्तर → गृहपाठ → रस्ता

# ६. लेखन कौशल्य

## निबंध लेखन

स्वविचारांचे प्रकटीकरण ही क्षमता, हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी निबंध लेखन या घटकाचा अभ्यास आवश्यक असतो. निबंध लेखन म्हणजे विचारांची विषयानुरूप केलेली मुद्देसूद मांडणी.

यावर्षी आपण प्रसंगलेखन, आत्मकथन आणि कल्पनाप्रधान या निबंध लेखन प्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

## निबंध लेखन

### (१) प्रसंगलेखन/अनुभवलेखन–

पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे चित्र हुबेहूब शब्दांत रेखाटणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात. निरीक्षणशक्ती व लेखनशैलीच्या विकासासाठी अनुभवलेखन/प्रसंगलेखन हा घटक महत्त्वाचा आहे.

**लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) प्रसंग लेखन करताना घटनांचा तार्किक विचार करावा.
(२) भाषा प्रभावी व चित्रदर्शी (हुबेहूब) वर्णन करणारी असावी.
(३) भाषा सोपी असावी. खूप आलंकारिक नसावी.
(४) लेखन प्रसंगानुरूप, संवेदनशील असावे.

**नमुना कृती**

**ज्ञानगंगा माध्यमिक विद्यालय, रत्नागिरी**

**वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम २०२१–२२**

– प्रमुख पाहुणे –
श्री. महेश सकपाळ
– अध्यक्ष –
श्री. संजय देशमुख

दिनांक
२२ डिसेंबर

वेळ
संध्याकाळी ४ वा.

सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

स्थळ – शाळेचे पटांगण

मुख्याध्यापक

- **पारितोषिकप्राप्त मित्राच्या आनंदात सहभागी होण्यासाठी तुम्ही शालेय वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित राहिला होतात, अशी कल्पना करा व त्या प्रसंगाचे लेखन करा.**

### (२) आत्मकथन–

**आत्मकथन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार करणे.

(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोग, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.

(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे. (परकाया प्रवेश)

(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.

(५) संपूर्ण लेखन प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत करणे.

**नमुना कृती**

*मी क्रीडांगण बोलत आहे....*

- आनंद
- महत्त्व/गरज
- क्रीडांगणापेक्षा टीव्हीचा प्रभाव
- खंत
- आजची स्थिती
- क्रीडांगणावर अतिक्रमण

### (३) वैचारिक–

**वैचारिक लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) या निबंध प्रकारात विचारांना प्राधान्य असते.

(२) विचाराला दोन बाजू असू शकतात.

(३) योग्य/अयोग्य दोन्ही बाजूंची साधक–बाधक चर्चा व्हावी.

(४) मुद्द्यांची मांडणी सुसंगत व तार्किक विचारांनुसार असावी.

(५) मुद्द्यांचे समर्थन करण्यास नामवंत विचारवंतांचे विचार, म्हणी, सुवचने यांचा आधार घ्यावा.

(टीप – वाचन, निरीक्षण, चिकित्सक विचार हे वैचारिक मांडणीसाठी आवश्यक आहे.)

**नमुना कृती**

*झाडे लावा झाडे जगवा*

- पर्यावरणाचा ऱ्हास
- झाडांचे उपयोग
- उपाययोजना
- वृक्षतोड–दुष्परिणाम

## हे शब्द असेच लिहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रसिद्ध | सहानुभूती | वैयक्तिक | जीवनशैली | भाषातज्ज्ञ | अभिव्यक्ती | विश्वकोश | दैनंदिनी |
| वैशिष्ट्य | साहाय्यक | वैश्विक | विपरीत | मुहूर्त | जीवनध्येय | मैत्रीण | निष्क्रिय |
| महत्त्व | शिरोधार्य | संस्कृती | तीर्थरूप | दृष्टी | कनिष्ठ | मैत्रिणीस | पारंपरिक |
| व्यक्तिमत्त्व | निर्णय | सांस्कृतिक | दुष्काळ | दृष्टिकोन | सर्वांगीण | हार्दिक | पुरस्कार |



## काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) ययाती- वि. स. खांडेकर
(२) बनगरवाडी- व्यंकटेश माडगूळकर
(३) झोंबी- आनंद यादव
(४) ऊन- शंकर पाटील
(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर- शंकरराव खरात
(६) वपूर्झा- व. पु. काळे
(७) कोसला- भालचंद्र नेमाडे
(८) ग्रामगीता- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
(९) गोष्टी माणसांच्या- सुधा मूर्ती
(१०) मराठी व्युत्पत्ति कोश- कृ. पां. कुलकर्णी
(११) कऱ्हेचे पाणी- प्र. के. अत्रे
(१२) मृत्युंजय- शिवाजी सावंत
(१३) फकिरा- अण्णाभाऊ साठे
(१४) वाचू आनंदे भाग १ ते ४- माधुरी पुरंदरे
(१५) लिहावे नेटके भाग १ ते ३- माधुरी पुरंदरे
(१६) सुगम मराठी व्याकरण व लेखन- मो. रा. वाळंबे



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://mr.wikipedia.org/wiki/पु.ल._देशपांडे
https://mr.wikipedia.org/wiki/नारायण_सुर्वे
https://mr.wikipedia.org/wiki/रघुनाथ_अनंत_माशेलकर
https://mr.wikipedia.org/wiki/रवींद्रनाथ_ठाकूर
https://mr.wikipedia.org/wiki/इंदिरा_संत
https://en.wikipedia.org/wiki/Chandu_Borde
https://youtu.be/nSmVnQBHQkY
https://youtu.be/E-E5jd4brXU

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेल्या पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी अक्षरभारती, इयत्ता दहावी (द्वितीय भाषा)

₹ ४८.००

